# आडत दुकानातील चोरीचा छडा लावून सात आरोपी निष्पन्न

## दोन आरोपींना केले जेरबंद करुन मुद्देमाल केला जप्त, स्थानिक गुन्हे शाखा बीडची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

मौजे मस्साजोग येथील धनलक्ष्मी ट्रैडर्स येथे दिनांक ३१/०१/२०२५ रात्री ०९.३० वा ते दि.०१/०२/२०२५ रोजीचे सकाळी ०६.०० वा. दरम्यान अज्ञात चोरटयांनी धनलक्ष्मी ट्रॅडर्स गोडाऊनचा पत्रा काढुन राजम्याचे (पावटा) १६५ कट्टे ७,४५,५००/- रु चे व नगदी ७५०००/- रु एकुण ८,१७,५००/- रु मुद्देमाल चोरुन नेला आहे. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.केज येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४३/२०२५ कलम ३३४(१) भा.न्या.सं .प्रमाणे दिनांक ०१/०२/२०२५ रोजी फिर्यादी गणेश डिगांमर गायकवाड , ट्रेडर्स दुकान चालक, रा.मस्साजोग ता.केज यांचे फिर्याद वरुन गुन्हा नोंद झाला होता.

मा.श्री. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड यांनी सदर गुन्हयाचा उकल करण्यासाठी आदेशीत केले होते त्याअनुषंगाने श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांनी राजमा चोरी गुन्हयाचा समांतर तपास करुन आरोपींचा शोध घेण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील पोउपनि महेश विघ्ने यांना आदेश दिले. त्यानंतर पोउपनि विघ्ने यांनी त्यांचे पथकातील अंमलदारसह आरोपीचा शोध घेत असतांना दिनांक १३/०२/२०२५ रोजी गुप्त बातमी मिळाली की, पावटा चोरीचे कट्टे हे रमेश उध्दव चव्हाण रा.ढोकी ता.जि.धाराशिव, २) विनोद नाना काळे रा.ढोकी व त्यांचे इतर साथीदारांनी मिळुन चोरी केलेली असून पावटा(राजमा) चोरुन नेण्यासाठी अशोक लेलॅड कंपनीचा पिकअप चा वापर केलेला असुन चोरीचा माल पिकअपमध्ये टाकुन ढोकी ते कळबं मार्गाने अंबाजोगाई येथे घेवुन जाणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन सपोनि श्री.विजयसिंग जोनवाल व स्थागुशा स्टाफ सह तात्काळ रवाना होवुन अंबाजोगाई कडे जाणाऱ्या रोडवरील माळेगाव फाटा




येथे सापळा लावला तेव्हा कळंब रोडवरुन एक पिकअप भरधाव वेगात येत होता त्याला हात देवुन थांबण्याचा ईशारा केला पण तो न थांबता पुढे पळुन गेला तेव्हा लागलीच पिकअपचा पाठलाग करुन थोडया अंतरावर पकडुन आतील इसमांना विचारपुस केली असता त्यांनी त्यांची नावे १) रमेश उध्दव चव्हाण वय २७ वर्षे रा. ढोकी,२) विनोंद नाना काळे वय २३ वर्षे दोन्ही रा. ढोकी ता.जि.धाराशिव असे सांगितले त्यावरुन त्यांना राजमा चोरीचे कट्टे चोरीबाबत विचारपुस केली असता त्यांनी एकुण ०७ जनांनी मिळुन सदर चोरी केलेली असून त्यांनी विनोंद काळे व राहुल लाला पवार यांनी मस्साजोग येथे एक आडत दुकानाची रेखी केली व नंतर त्यांचे इतर साथीदारांनी मिळुन रात्री चोरी करायचा प्लान केला, शंभु कारखाना येथे सर्वांनी जेवण केले व अशोकल लिलँड पिकअप ने कळंब - केज मार्गे मस्साजोग येथे राहुल याने अधिच पाहुन ठेवलेल्या आडत दुकानावर गेले तेथे एक जन रस्त्यावर पाहणीसाठी ठेवला व बाकी साथीदारांनी पक्कड व पान्हयाने दुकानाचे पत्रा नट काढुन पत्रा बाजुला करुन दुकानातील पावटा (राजमा) चे पोते दुकानाबाहेर काढुन पिकअपमध्ये टाकुन चोरी करुन गावी घेवुन गेले त्यानंतर आज रोजी शेतकरी बनवुन अंबाजोगाई येथे आडत दुकानामध्ये विकायचे होते असे कळविले वरुन दोन्ही आरोपींना त्यांचे इतर ०५ साथीदारांची नावे विचारली . त्यातील साथीदार राहुल लाला पवार हा घटनेनंतर अपघातामध्ये मयत झालेला असुन उर्वरित ०४ आरोपींचा शोध घेवुन अटक करण्यासाठी शोध सुरु आहे.

आरोपीतांचे ताब्यातुन ४२ पोते पावटा (राजमा) कि.अ.१,२६,०००/- रु व एक अशोक लेलँड कंपनीचा पिकअप कि.अं.४,५०,०००/- रु असा एकुण ५,७६,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे १) रमेश उध्दव चव्हाण वय २७ वर्षे रा. ढोकी (ता,जि.धाराशीव) यांचा पुर्व अभिलेख पाहतो पो.स्टे.बार्शी, परांडा, येथे दरोडा टाकणे व दरोडयाची तयार करणे असे गुन्हे दाखल आहेत. २) विनोंद नाना काळे वय २३ वर्षे रा. ढोकी (ता.जि.धाराशिव) यांचा पुर्व अभिलेख पाहता ढोकी पो.स्टे.ला दरोडा, घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

दोन्ही आरोपींना व जप्त केलेला मुद्देमाल पुढील कार्यवाहीस्तव पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे. उर्वरित आरोपी शोध चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.केज व स्था.गु.शा.बीड करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, मा.श्री.चेतना तिडके अपोअ अंबाजोगाई व पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंग जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, पोउपनि हनुमान खेडकर, पोह/ महेश जोगदंड, भागवत शेलार, राजु पठाण, तुषार गायकवाड, पोअं/बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.

# ट्रेनी शिक्षक आक्रमक झेडपीच्या दारात मांडला ठिय्या






छाया:श्रीकांत कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांनी (दि.१४)रोजी दुपारी जिल्हा परिषदेवर मुक मोर्चा काढून प्रशिक्षणार्थींचा कार्यकाळ वाढवण्याची मागणी केली. भर उन्हात मोर्चा काढत जिल्हा परिषदेच्या दारात ठिय्या मांडला.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ट्रेनी शिक्षकांसह अन्य प्रशिक्षणार्थींची नियुक्ती जिल्ह्यातील विविध आस्थापनांमध्ये करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील हजारो प्रशिक्षणार्थींचा यामध्ये समावेश असून सदरील योजनाचा कार्यकाळ वाढवण्यात यावा, विद्यवेतनामध्ये वाढ करण्यात यावी आणि युवा प्रशिक्षणार्थींना शासकीय सेवेत १५ % आरक्षण देण्यात यावे आदि मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. या मुक मोर्चात जिल्हाभरातील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रशिक्षणार्थींचा कार्यकाळ वाढलाच पाहिजे, आम्हाला न्याय द्या, भिक नको हक्क द्या, प्रशिक्षणार्थींना न्याय द्या अशा घोषवाक्यांचे फलक हाती घेवून प्रशिक्षणार्थी मुक मोर्चात सहभागी झाले होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज बैठक

**कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे - जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ११ वा.राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे होत आहे, याप्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

या जिल्हा कार्यकारणी व कार्यकर्ता बैठकीसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे आमदार संदीप भैया शिरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थिती संपन्न होणार आहे.

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगर पंचायत नगरपालिका निवडणुकी संदर्भात पदाधिकारी कार्यकर्ते महत्त्वपूर्ण बैठक संपन्न होणार आहे. तरी या बैठकीसाठी आमदार, माजी आमदार, जिल्हा पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच,सह कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



## होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळेचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

तालुक्यातील होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत व्यवस्थापक राहुल सावंत यांनी भारतीय महिला खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिचा गुरुवारी (दि.६) सत्कार केला.

प्रियंका इंगळे भारताला पहिला खो-खो वर्ल्ड कप जिंकून दिला आहे. त्याबद्दल तिचा ठिकठिकाणी सन्मान केला जात आहे. होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत देखील सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते नेताजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदवीधर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत, होळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक देवानंद मलदोडे, पाटोदा अंबा शाखेचे व्यवस्थापक प्रीतम गिरीगोसावी, मोरेवाडी शाखेचे व्यवस्थापक तोसिफ शेख, आडसचे शाखा व्यवस्थापक सचिन गोहोकर, सहायक शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर बिराजदार, लिपिक पल्लवी गवांडे, सटवा मेंढके, दत्तु इंगळे, हनुमंत इंगळे, भगीरथ इंगळे यांच्यासह इंगळे कुटुंबीय, ग्रामस्थ उपस्थित होते.

## भारतरत्न नानाजींच्या विचारात सर्व प्रश्नांची उकल- डॉ. उपेंद्र कुलकर्णी

### सावरकर महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

सध्याच्या परिस्थिती मध्ये समाजात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उकल करायची असेल तर भारतरत्न नानाजींचे विचार आचरणात आणावेत असे प्रतिपादन जन शिक्षण शोध संस्थानचे संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांनी स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वा. सावरकर महाविद्यालयात दिनांक १३ व १४ फेब्रुवारी २०२५ रोजी 'भारतरत्न नानाजी देशमुख अँन आर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य विष्णुपंत कुलकर्णी, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे परिषदेचे समन्वयक उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. उपेंद्र कुलकर्णी म्हणाले की सामाजिक पुरुषार्थ जागवण्याची प्रक्रिया नानाजींनी सुरू केली. याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. शहर आणि ग्रामीण दरी रुंदावत आहे. सर्वांगीण विकास साध्य करायचा असेल तर जनसहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर रोखणे गरजेचे आहे. सर्व सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास केला पाहिजे. अध्यक्षीय समारोपात कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले आले की नानाजींचा विचार हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे. त्यांनी समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. दोन दिवसीय परिषदेमध्ये त्यांच्या विविध पैलूंवर मंथन झाले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला परिषदेचे समन्वयक डॉ. उत्तम साळवे यांनी दोन दिवसातील विविध सत्रांचा आढावा मांडला. परिषदेमध्ये सहभागी झालेले डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. रोहिनी भरड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेधा गोसावी यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रो. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी मानले. समारोप कार्यक्रमाला



संस्थेचे पदाधिकारी प्रमोद कुलकर्णी, महेश वाघमारे, एकनाथ जाधव, डॉ संध्या कुलकर्णी, प्राचार्य प्रीती पोहेकर, प्राचार्य मुकूंद देवर्षी, डॉ.अपर्णा कुलकर्णी, डॉ दिगंबर तंगलवाड , विविध विद्यापीठ, महाविद्यालयातून प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. परिषदेच्या स्मरणिके मध्ये ७० शोधनिबंधांचे प्रकाशन करण्यात आले.

## दहावी, बारावी विद्यार्थ्यांच्या क्रीडा ग्रेस गुणांबद्दल ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पध्दतीने भरणे बाबत आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे.

याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन कार्यालयाद्वारे सदरचे अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळास ग्रेस गुण मिळणे करीता पाठविले जातात.

सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रीया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती. व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रीया निर्दोष करण्यासाठी या वर्षीपासुन म्हणजेच २०२४-२५ पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.

खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पद्वारे या वर्षीपासुन सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचा सवलत गुणांबाबतचा ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सर्व शाळा विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, विद्यार्थी यांनी उपरोक्त विषयासंदर्भात दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची दक्षता घ्यावी. त्यानुसार खेळाडू विद्यार्थी व जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडू विद्यार्थ्यांना सदर प्रणालीद्वारे अर्ज करण्या बाबत अवगत करण्यात येत आहे. अधिकच्या माहिति करीता क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांना ९६२३७८११२१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, हे कळवितात.

## जिल्हास्तर खेलो इंडिया कबड्डी केंद्र, बीड क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्त्वावर नियुक्ती होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ फेब्रुवारी**

केंद्रशासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या खेलो इंडिया या योजने अंतर्गत देशातील विविध जिल्ह्यामध्ये १००० खेलो इंडिया केंद्र पुढील ४ वर्षामध्ये निर्माण करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत बीड जिल्ह्यास कबड्डी या खेळाचे केंद्र सुरु करण्यास मान्यता प्राप्त झाली त्यानुसार जिल्हा क्रिडा संकुल, बीड येथे केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर योजनेचा उद्देश जिल्ह्यातील उत्कृष्ट १५ मुले व १५ मुली खेळाडूंची निवड करुन त्यांना तज्ञ प्रशिक्षकाद्वारे तंत्रशुध्द प्रशिक्षण देऊन प्रतिभावान खेळाडू तयार करणे हा आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीडला मंजूर झालेल्या खेलो इंडिया कबड्डी केंद्रावर प्रशिक्षण देण्यासाठी पुढील अर्हताप्राप्त प्रशिक्षकांची नियुक्ती मानधन तत्वावर करावयाची आहे.

प्रशिक्षक अर्हता:- १) वयोगट १८ ते ४५ वर्षे यामध्ये अतिउच्च कामगिरी / गुणवत्ता / एशियन गेम्स / जागतिक अजिंक्यपद अधिकृत स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त व प्रशिक्षणाच्या अनुभवासह ३) जागतिक करंडक स्पर्धा / एशियन चैंपीयनशीप / साऊथ एशियन स्पर्धा / संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त खेळाडू - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ४) राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कार्थी प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ५) एनआयएस पदविका किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेवल कोर्सेस किंवा बी.पी.एड्. एम.पी.एड. सह राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा नॅशनल गेम्स पदक प्राप्त - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ६) राज्यस्तर खेळाडू बी.पी.एड., एम.पी.एड. सह कमीत कमी १० वर्ष प्रशिक्षणाचा अनुभव.

प्रशिक्षकांची नियुक्ती ही तात्पुरती स्वरुपाची निवळ मानधन तत्त्वावरील आहे. प्रशिक्षक मानधन हे प्रति महिना १५,०००/- ते रुपये २५,०००/- एवढ्या स्वरुपात असेल. प्रशिक्षकांचा परफॉर्मन्स आढळून न आल्यास त्यास जिल्हास्तर खेलो इंडिया केंद्र नियंत्रण व देखरेख समिती, बीड कधीही प्रशिक्षक पदावरुन दूर करेल.वरील अर्हता धारक प्रशिक्षकांनी कृपया आपले अर्ज कार्यालयीन वेळेमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे दिनांक २१/०२/२०२५ रोजी पर्यंत सादर करावेत. अधिक माहिती करीता रेवननाथ शेलार यांना ९०७५४७६७९१ या भ्रमनध्वनीवर असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी केले आहे.